# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४१, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२११६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com


जा.क्र.मजीप्रा-२०१३/बैठक-१२७/(०९)/आ-४ दिनांक : ७/३/२०१३

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री,ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२७ व्या बैठकीचे इतिवृत्त..**
**दिनांक :** २६ फेब्रुवारी, २०१३ दुपारी ४.३० वाजता..
**स्थळ :** मित्तल टॉवर्स, "ए" विंग, ३रा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई -२१

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंगळवार दिनांक २६.२.२०१३ रोजी झालेल्या १२७ व्या बैठकीचे इतिवृत्त आपले माहितीसाठी सोबत सादर करण्यांत येत आहे.

आपला विश्वासु,

मुख्य प्रशासकीय अधिकारी करिता

7 MAR 2013

कृमाप..



( महाराष्ट्र शासन उपक्रम )
पाणी हे जीवन आहे ! पाण्याची बचत करा !

प्रत :-

मुख्य अभियंता, म.जी.प्रा., जलव्यवस्थापन, ठाणे / नागरी व ग्रामीण योजना, ठाणे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे / अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक / मध्यवर्ती नियोजन, मुंबई.

आपल्या संबंधित असलेल्या कार्यक्रम बाबीवर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

वित्त व लेखा शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.८ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

अधीक्षक अभियंता (समन्वय /मुख्यालय),म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई/ म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.९ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) म.जी.प्रा., ठाणे / नागपूर.

उप मुख्य लेखा अधिकारी (१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१,२,३,४,५,६ व ७ यावर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

प्रशासकिय-नि-आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी /कार्यासन अधिकारी, (आस्थापना- ) म.जी.प्रा., मुंबई / सिडको भवन, नवी मुंबई यांच्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

आपल्या कार्यासनाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१,२,३,४,५,६ व ७ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा..

सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

व्यवस्थापक, स्थावर मालमत्ता कक्ष (आ-९) सिडको भवन, नवी मुंबई.

आपल्या कार्यासनाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.६ वर कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल त्वरीत सादर करावा.

सर्व संबंधितांनी कार्यपुर्ती अहवाल दिनांक १८ मार्च, २०१३ पर्यंत सादर करावा.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२७ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२७ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.लक्ष्मण ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि.२६/२/२०१३ रोजी सायं. ४.३०वाजता संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते:-

१. मा.ना.श्री. लक्ष्मण ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री.जयंत पाटील, मंत्री, ग्रामविकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष
३. मा.सुनिल पोरवाल, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व.विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.एस.एम.म्हात्रे, सहसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
५. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई -३२.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते:-

१. श्री.पंजाबराव वानखडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई.
२. श्री.हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागरी व ग्रामीण योजना, ठाणे.
३. श्री.एम.ए.जवांदे, मुख्य अभियंता (प्रभारी) म.जी.प्रा., जलव्यवस्थापन, ठाणे.
४. श्री.बी.के.सवाई, मुख्य अभियंता ,मध्यवर्ती नियोजन ,मुंबई
५. श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त) म.जी.प्रा. मुंबई,
६. श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (समन्वय) म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
७. श्री.बी.एस.पाटील, उप मुख्य लेखाधिकारी(१), म.जी.प्रा., मुंबई

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२६ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दि.२१.११.२०१२ रोजी संपन्न झालेल्या १२६ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

(४)

**कार्यक्रम बाब क्र.२:**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२६ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२१.११.२०१२ रोजी संपन्न झालेल्या १२६ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सविस्तरपणे अवगत केले. याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.३:**

**विषय:** म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील ३ कर्मचा-यांनी स्वतःच्या गंभीर आजारावर शासनमान्य /खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकिय खर्चाच्या प्रतीपुर्तीस "विशेषबाब" म्हणून मंजुरी देणेबाबत.

सदर विषयाबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

**ठराव :**

प्रस्तावातील ३ कर्मचाऱ्यांची खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय प्रकरणे एक विशेष बाब म्हणून मंजुर करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.तथापि यापुढे अशी विशेष प्रकरणे मा.संचालक मंडळापुढे न आणता दि.३१.३.२०१२ च्या मजीप्राच्या परिपत्रकानुसारच सर्व प्रकरणी निर्णय घ्यावा.

**कार्यक्रम बाब क्र.४:**

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांकरिता बदल्यांचे विनियमन लागू करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मध्ये कलम ६६ (१) व (२) (ब) अन्वये म.जी.प्रा.कर्मचाऱ्यांकरिता बदल्यांचे स्वतंत्र नियम तयार करण्याची आवश्यकता असल्याचे सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले. याबाबत सविस्तर चर्चा होवून पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यांत येतो की, म.जी.प्रा.तील कर्मचाऱ्याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम ६६ (१) व (२) (ब) मधील अधिकाराचा वापर करुन सोबत जोडलेल्या परिशिष्ट -१ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन २०१३ यास मान्यता देण्यात येत आहे. सदर नियम राजपत्रात प्रसिध्द करण्यापूर्वी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची संमती मिळविण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

(५)

**कार्यक्रम बाब क्र.५:**

**विषय :** मीत्रा ही स्वायत्त संस्था झाल्यामुळे या संस्थेच्या संचलनासाठी आर्थिक वर्ष सन २०१३-१४ करिता वेतन व भत्ते, प्रशिक्षण खर्च, संशोधन कार्यावरील खर्च, देखभाल व दुरुस्ती वरील खर्च व इतर अनुषंगीक खर्चासाठी आवश्यक निधी तात्पुरत्या स्वरुपात शासनाकडून उपलब्ध होईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून निधी मिळणे बाबत व शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर सदर निधी मजीप्राकडे वळता करणेबाबत.

सदर विषयाबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

१. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.९.२०११ नुसार महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण ठरविण्यात आले आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३.४ नुसार राज्यातील सर्व विभागाच्या प्रशिक्षण संस्थांना स्वायत्तता देण्याचा निर्णय झाला आहे.त्यानुसार म.जी.प्राच्या अधिनस्त असलेली नाशिक रिसर्च ट्रेनिंग सेंटर,नाशिक ( NRTC) ही संस्था पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि. २१.५.२०१२ च्या शासन निर्णयानुसार स्वायत्त झाली असून या संस्थेचे नामकरण Maharashtra Environmental Engineering Training and Research Academy ,(MEETRA) 'मीत्रा' नाशिक असे करण्यात आलेले आहे.

उक्त सा.प्र.विभागाच्या शासन निर्णय दि.२३.९.२०११ च्या परिच्छेद ३.४ नुसार संस्था स्वायत्त झाल्यानंतर या संस्थेला शासनाकडून अनुदान देण्यात येईल असा निर्णय झाला आहे. मित्रा या संस्थेचे सन २०१३-१४ या वर्षाचे आर्थिक अंदाजपत्रक तयार झाले असून मित्राच्या नियामक मंडळाच्या सभेमध्ये त्यास मान्यता घेण्यात येत आहे. त्यानंतर सदर मंजुर झालेल्या अंदाजपत्रकानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे निधीची मागणी करण्यात येईल. दरम्यान 'मित्रा' स्वायत्त झाल्यामुळे २०१३-१४ या आर्थीक वर्षापासून या संस्थेचे सर्व आर्थीक व्यवहार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे न होता स्वतंत्र होणार आहेत.

सबब शासनाकडून मित्रा या संस्थेस आर्थिक अनुदान मिळेपर्यंत या संस्थेला वेतन व भत्ते ,प्रशिक्षण व संशोधन व कार्यालयीन खर्च इत्यादीकरिता मजीप्रातर्फे मित्रा या संस्थेला सन २०१३-१४ करिता गेल्या ५ वर्षाच्या खर्चाच्या सरासरी एवढा रु.१२५.८० लक्ष निधी मंजुर करण्यास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. (सोबत गेल्या ५ वर्षाच्या खर्चाचा तक्ता परिशिष्ट-२जोडला आहे)

२. त्याचप्रमाणे 'मीत्रा' संस्थेच्या विस्तारीकरण व सुधारणा यासाठी सुधारणा व सहाय्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडून रु.२००.०० लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे व निधीही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देण्यात आलेला आहे तो 'मीत्रा' या संस्थेस वर्ग करणेस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

7/3

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

(६)

**ठराव**

१. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.९.२०११ नुसार महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण ठरविण्यात आले आहे व त्यानुसार सर्व विभागांच्या प्रशिक्षण संस्थांना स्वायत्तता देण्याचा व अशा स्वायत्त झालेल्या संस्थांना शासनाकडून अनुदान देण्यात येईल असा निर्णय झाला आहे. त्यानुसार म.जी.प्रा.ची NRTC ही संस्था आता पाणी पुरवठा विभागाची प्रशिक्षण संस्था, मीत्रा या नावाने दि.३१.५.२०१२ च्या शासन निर्णयानुसार स्वायत्त झाली आहे.

मित्रा या संस्थेचे सन २०१३-१४ या वर्षाचे आर्थिक अंदाजपत्रक तयार झाले असून मित्राच्या नियामक मंडळाच्या सभेमध्ये त्यास मान्यता घेण्यात येत आहे. त्यानंतर सदर मंजुर झालेल्या अंदाजपत्रकानुसार सा.प्र.वि.च्या दि.२३.९.२०११ च्या उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३.४ नुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे, सदर अनुदान मंजुर करण्याकरिता मित्रातर्फे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. दरम्यान 'मित्रा' स्वायत्त झाल्यामुळे २०१३-१४ या आर्थीक वर्षापासून या संस्थेचे सर्व आर्थीक व्यवहार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे न होता स्वतंत्र होणार आहेत. सबब शासनाकडून मित्रा या संस्थेस आर्थिक अनुदान मिळेपर्यंत पुढील १० वर्षे मजीप्रातर्फे निधी उपलब्ध करुन देण्यास तसेच सन २०१३-१४ करिता वेतन व भत्ते ,प्रशिक्षण व संशोधन व कार्यालयीन खर्च इत्यादीकरिता शासनाकडून निधी प्राप्त होईपर्यंत गेल्या ५ वर्षाच्या खर्चाच्या सरासरी रु.१२५.८० लक्ष निधी मजीप्रातर्फे मित्राला देण्यास व शासनाकडून मित्राला निधी मिळाल्यानंतर सदर निधी मजीप्राकडे वळता करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे.

२. त्याचप्रमाणे 'मीत्रा' संस्थेच्या विस्तारीकरण व सुधारणा यासाठी सुधारणा व सहाय्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडून रु.२००.०० लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे व निधीही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देण्यात आलेला आहे तो 'मीत्रा' या संस्थेस वर्ग करणेस संचालक मंडळ मान्यता देत आहे.

याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६:**

**विषय:** ४६३, स्टॅवली रोड, पुणे येथील म.जी.प्रा. च्या प्रशासकीय इमारतीचा दुसरा मजला आयकर अपिलिय अधिकरणास भाडे तत्वावर देण्यात आलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

४६३, स्टॅवली रोड, पुणे येथील म.जी.प्रा. च्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु असतानां केंद्र सरकारच्या आयकर अपिलीय अधिकरण कार्यालयाकडून प्राधिकरणाच्या प्रशासकीय इमारतीचा

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

एक मजला भाडेतत्वावर मिळणेबाबतची मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे दि.१.१०.२०१२ पासून आयकर अपिलीय अधिकरणास या इमारतीतील ९१३.२६ चौ.मी. क्षेत्रफळाचा दुसरा मजला ५ वर्षाच्या कालावधीकरिता भाडयाने उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच दर वर्षी सीपीडब्ल्यू डी यांचेकडून भाडे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून त्याप्रमाणे भाडे निश्चित करण्याबाबतच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून प्रस्तावित केल्यानुसार संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, ४६३, स्टॅवली रोड, पुणे येथील बी.ओ.टी.तत्वावर बांधण्यात आलेल्या मजीप्राच्या प्रशासकीय इमारतीतील दुसरा मजला, आयकर अपिलीय अधिकरण कार्यालय, पुणे यांना ऑक्टोंबर २०१२ पासून जागा भाडे तत्वावर ५ वर्षाच्या कालावधीकरिता देण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. दरवर्षी सी.पी.डब्ल्यू.डी. यांचेकडून भाडे प्रमाणपत्र (Rent Reasonableness Certificate) प्राप्त करुन घेऊन त्याप्रमाणे भाडे निश्चित करण्याबाबत तसेच आयकर अपिलीय अधिकरण कार्यालयाशी चर्चा करुन त्याप्रमाणे वार्षिक भाडेवाढ मजीप्रास प्राप्त करुन देण्याची कार्यवाही करण्याकरिता सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७:**

विषयः महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियांत्रिकी संवर्गातील अधिका-यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.

सदर कार्यक्रमबाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२१.११.२०१२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या १२६ व्या बैठकीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियांत्रिकी संवर्गातील अधिकाऱ्यांची गरज लक्षात घेता म.जी.प्रातील अभियांत्रिकी संवर्गातील अधिकाऱ्यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती करण्याबाबत सादर केलेली प्रकरणे पुढील आदेशापर्यंत मान्य करण्यात येवू नये असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. तथापि महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवानिवृत्ती) १९८२ नियम ६५(१) (ए) नुसार ज्या कर्मचाऱ्यांची अर्हताकारी सेवा ३० वर्ष पूर्ण झाल्यानंतर जर संबंधीत कर्मचाऱ्यांची स्वेच्छा सेवानिवृत्त होण्याची इच्छा असेल व त्या तारखेच्या ३ महिने अगोदर त्यांनी नियुक्त प्राधिकाऱ्याला लेखी नोटीस दिली असेल तर अशा कर्मचाऱ्याची स्वेच्छा सेवानिवृत्तीची प्रकरणे मंजुर करणे आवश्यक असल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून खालीलप्रमाणे सुधारित ठराव पारीत करण्यात आला.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

(८)

**ठरावः**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि.२१.११.२०१२ च्या १२६ व्या बैठकीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियांत्रिकी संवर्गातील अधिकाऱ्यांची गरज लक्षात घेता अभियांत्रिकी संवर्गातील अधिकाऱ्यांना स्वेच्छा सेवा निवृत्तीची विनंती पुढील आदेशापर्यंत मान्य करण्यात येवू नये असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयामध्ये अंशतः सुधारणा करण्यात येवून ,आता यापुढे अभियांत्रिकी संवर्गातील ज्या अधिकाऱ्यांची अर्हताकारी सेवा ३० वर्षे पूर्ण झाली आहे व त्यांनी म.ना.से.(से.नि.) १९८२ मधील नियम ६५ (१) (ए) नुसार ३ महिन्याची स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस दिली असेल फक्त अशाच अभियंत्यांची स्वेच्छा सेवा निवृत्ती मंजुर करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८:**

विषय: राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने मजीप्राने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.

सदर कार्यक्रमबाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

शासन निर्णय क्र.पीएसयु.१००५/सीआर.२६/पीएसयु/मंत्रालय, मुंबई-३२, दि.१३.३.२००६ व शासन निर्णय क्र.पीएसयु.१००५/सीआर.२६/पीएसयु/मंत्रालय, मुबई-३२, दि.२२.३.२००६ तसेच शासन निर्णय क्र.शासाउ १०.०५/प्र.क्र.२६/साउ दि.१.७.२०१० अन्वये सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्गमित झाली आहेत. यानुसार अल्प मुदतीच्या गुंतवणूक सदस्य सचिव यांच्या मान्यतेने केल्या जातात व शासन निर्णयातील सूचनेनुसार अशा अल्प मुदतीच्या गुंतवणूकी संचालक मंडळाच्या प्रत्येक बैठकीत मान्यतेसाठी सादर केल्या जातात. प्रस्तुत कार्यक्रम बाबीं मध्ये अल्प व दिर्घ मुदतीच्या कालावधीसाठी केलेल्या गुंतवणूकीचे प्रस्ताव असनू ते सदस्य सचिव व मा.मंत्री , पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष म.जी.प्रा.स्तरावर मान्यतेने केलेले आहेत. केलेल्या गुंतवणूकीचे प्रस्ताव शासन निर्णयानुसार असल्याने प्रस्ताव मान्य करण्यात यावा असे सदस्य सचिव यांनी नमुद केले. चर्चेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यांत येतो की, दि.११.११.२०१२ ते दि.१९.२.२०१३ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे अल्प मुदतीच्या व दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.९:**

विषय: अकोला पाणी पुरवठा योजना दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करुन घेणे बाबत.

सदर कार्यक्रमबाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

अकोला महानगरपालिकेने अकोला पाणी पुरवठा योजना मजीप्रामार्फत चालविणेबाबत विनंती केली आहे. त्यानुसार अकोला पाणी पुरवठा योजना मजीप्राकडे ३० वर्षासाठी देखभाल-दुरुस्तीसाठी हस्तांतर करुन घेण्याबाबत सदस्य सचिव, संचालक (वित्त) त्याचप्रमाणे मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन यांनी अभ्यास करुन निर्णय घेणे आवश्यक राहील. त्यासाठी नागपूर महानगरपालिकेअंतर्गत Nagpur Environemental Services Ltd. ही कंपनी स्थापन करुन त्या कंपनीसोबत मनपाने ज्या प्रकारे Relationship Agreement केलेले आहे. त्याच धर्तीवर मजीप्राने कार्यवाही करणे आवश्यक राहील. सदर कार्यवाही सुलभ व योग्यरितीने होण्यासाठी Transaction Advisery म्हणून तज्ञ सल्लागाराची नेमणुक करणे आवश्यक असल्याचे सदस्य सचिव, मजीप्रा. यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले. यावर सविस्तर चर्चा होवून अकोला शहर पाणीपुरवठा योजना हस्तांतरीत प्रक्रियेसाठी Transaction Advisery म्हणून तज्ञ सल्लागाराची नेमणुक करणेस संचालक मंडळाने मान्यता दिली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, अकोला शहर पाणीपुरवठा योजना पुढील ३० वर्षाच्या कालावधीकरिता मजीप्रामार्फत देखभाल दुरुस्तीकरिता हस्तांतरित करुन घेण्याच्या अनुषंगाने उपरोक्त प्रस्तावित केल्यानुसार सदस्य सचिव, संचालक (वित्त) त्याचप्रमाणे मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन यांनी अभ्यास करुन निर्णय घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत असून, त्यासाठी नागपूर महानगरपालिकेअंतर्गत Nagpur Environemental Services Ltd. ही कंपनी स्थापन करुन त्या कंपनीसोबत मनपाने ज्या प्रकारे Relationship Agreement केलेले आहे. त्याच धर्तीवर अकोला महानगरपालिका व म.जी.प्रा. अथवा म.जी.प्रा.ने स्थापन केलेल्या कंपनी यांच्यामध्ये Relationship Agreement असणे आवश्यक आहे. त्या Relationship चे स्वरुप कसे असावे व संस्थात्मक व वित्तीय संरचना कशी असावी यासाठी म.जी.प्रा.ने Transaction Advisery म्हणून तज्ञ सल्लागाराची नेमणुक करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१

**विषय:** मजीप्राच्या नागरी पाणी पुरवठा केंद्रासंदर्भातील सुधारणा करण्यासाठी आवश्यक असलेल्या भांडवली खर्चाच्या कामांकरीता हौसींग ॲन्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉरपोरेशन अर्थात हुडको या संस्थेकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी तत्वतः मान्यता मिळण्याबाबत.

मजीप्रामार्फत सद्यःस्थितीत मजीप्राच्या मालकीच्या २५ नागरी पाणी पुरवठा केंद्राची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती केली जाते. प्रस्तुत पाणी पुरवठा केंद्राव्दारे सुमारे ३४.६० लक्ष लोकसंख्येस दैनंदिन पाणी पुरवठा केला जातो. या सर्व पाणी पुरवठा केंद्राचे व्यवस्थापन मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन, मजीप्रा,ठाणे यांच्या नियत्रंणाअंतर्गत विविक्षितरित्या जलव्यवस्थापनासाठी नामनिर्देशित करण्यांत आलेल्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत केले जाते. सन २०१२-१३ मध्ये मजीप्राला पाणी विक्रीव्दारे मिळणाऱ्या एकूण रु. १६० कोटी उत्पन्नापैकी सुमारे १४५ कोटी रुपयाच्या उत्पन्नाचा वाटा नागरी पाणी पुरवठा केंद्राचा राहील.नागरी पाणी पुरवठा केंद्राचा दैनंदिन देखभाल दुरुस्तीसंदर्भातील आर्थिक ताळेबंदाचा विचार केल्यास, त्यातून सुमारे रु. २० कोटी एवढा निव्वळ नफा अपेक्षित आहे. असे असले तरी, विनामहसुल पाण्याचे प्रमाण ४० ते ५०% च्या दरम्यान आहे. म्हणजेच विनामहसुल पाण्याचे (NRW) प्रमाण किमान २०% पर्यत आणल्यास त्याप्रमाणात दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी होईल व तेवढया प्रमाणात नागरीकांना वितरीत करण्यासाठी जादा पाणी उपलब्ध राहील व पर्यायाने मजीप्राच्या उत्पन्नात वाढ होईल.

त्याचप्रमाणे नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या क्षेत्रात काही ठिकाणी वाढत्या रहिवाशी क्षेत्राला अनुसरुन आवश्यक त्या प्रमाणात वाढीव पाणी पुरवठयाची व्यवस्था करणे व अनुषंगिक वितरण व्यवस्थेत वाढ करणे देखील आवश्यक आहे. यासाठी भांडवली खर्चाची कामे करणे गरजेचे ठरणार आहे. तथापि, यासाठी भांडवली गुंतवणुकीची आवश्यकता अपरिहार्य आहे. नागरी क्षेत्रातील अशा भांडवली गुंतवणुकीच्या कोणत्याही योजनांना शासनाचे अनुदान शासनाने मान्य केलेल्या विहित आकृतीबंधानुसार प्राप्त होत असते. सद्यःस्थितीत पाणी पुरवठा योजनांसंदर्भातील भांडवली खर्चाची कामे शासनाकडून महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान अथवा नगरोत्थान इत्यादी कार्यक्रमांतर्गत मंजूर केली जातात. सदरहू दोन्ही कार्यक्रमांच्या वित्तीय आकृतीबंधामध्ये १०% लोकवर्गणी व किमान २०% कर्ज उभारण्याची तरतुद आहे. मजीप्राच्या २५ नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या संदर्भातील भांडवली गुंतवणूकीची कामे शासनाकडून मान्य झाली तरी, सदर योजनांच्या खर्चामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे किमान ३०% खर्चाची तरतूद मजीप्राने करणे अपेक्षित असते. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील एकूण कार्यभार व त्याव्दारे मिळणारे उत्पन्न व त्याअनुषंगाने अस्तित्वातील आस्थापनेवरील वेतनभत्ते व निवृत्ती वेतनावरील खर्चाचा विचार करता, एवढया निधीची उपलब्धता मजीप्राच्या निधीतून करणे केवळ अशक्य आहे. यादृष्टीने मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रातील भांडवली खर्चाच्या कामाकरीता मजीप्राच्या हिश्याची तरतूद करण्यासाठी अन्य सुयोग्य पर्याय विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते.

मा.अध्यक्ष तथा मंत्री
पाणी पुरवठा व स्वच्छता

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कर्ज उभारणी शक्यता तपासणी**

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मजीप्राच्या २५ नागरी पाणी पुरवठा संदर्भातील भांडवली खर्चाच्या कामामध्ये मजीप्राच्या हिश्याची रक्कम उभी करण्यासाठी सुयोग्य वित्त संस्थेकडून कर्ज उभारणी करणे हा सक्षम मार्ग ठरेल. अशी कर्ज उभारणी ,यापूर्वी पाणी पुरवठा योजनांसाठी कर्ज उपलब्ध करुन दिलेल्या हुडको या केंद्र शासनाच्या उपक्रम असलेल्या वित्त संस्थेकडून केली जाऊ शकते. हुडकोकडून कर्ज मिळण्यासंदर्भातील शक्यता पडताळून पाहण्याच्या दृष्टीने हुडकोच्या मुंबई कार्यालयातील मुख्य प्रबंधकाशी दि. १४.२.२०१३ रोजी प्राथमिक चर्चा केली आहे. सदर चर्चेमध्ये हुडकोव्दारा असे कर्ज मंजूर करण्यांबाबत हुडको अधिकाऱ्यांनी अनुकुलता दर्शविली आहे.

**प्रस्ताव**

उपरोक्त नमुद केल्यानुसार मजीप्राच्या मालकीच्या अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रांतर्गत अंबरनाथ व बदलापूर शहरांसाठीच्या मंजूर योजनेअंतर्गत उपलब्ध करावयाच्या लोकवर्गणी व कर्जहिश्याची रक्कम हुडको कडून उपलब्ध करुन घेता येणे शक्य होईल.

अंबरनाथ व बदलापूर या दोन्ही शहरांना दैनंदिन पाणी पुरवठा केला जातो. सदर दोन्ही शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्थांचे थेट ग्राहकापर्यतच्या सेवेचे व्यवस्थापन मजीप्रा मार्फत केले जाते. या दोन्ही शहरासाठी कन्सेप्ट नोंट तयार करण्यांत आली असून, परिशिष्ट-१ मध्ये अवलोकनार्थ सादर केली आहे. अंबरनाथ शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्थेतील भांडवली खर्चाच्या कामाकरीता रु. ७७.०५ कोटी खर्चाच्या योजनेस शासनाने मान्यता प्रदान केली आहे. सदर योजनेमध्ये रु. ३८.५३ कोटी एवढे शासनाचे अनुदान उपलब्ध होणार असून उर्वरीत रु. ३८.५३ कोटी एवढी रक्कम मजीप्रास उभारावी लागेल. याचप्रमाणे बदलापूर शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्थेतील भांडवली खर्चाच्या कामाकरीता रु. ८१.५९ कोटी खर्चाच्या योजनेस नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत नुकतीच मान्यता प्रदान केली आहे. सदर रु. ८१.५९ कोटी रक्कमेपैकी रु. १६.३२ कोटी एवढी रक्कम मजीप्रास उभारावी लागेल. या दोन्ही शहराच्या कामांचा एकत्रित विचार केल्यास एकूण रु. १५९.६४ कोटी खर्चाच्या भांडवली खर्चाच्या कामासाठी रु. ५४.८५ कोटी एवढी रक्कम मजीप्रास उभारावी लागेल.

उपरोक्त नमूद केल्यानुसार सदर रु. रु. ५४.८५ कोटी रक्कम कर्ज रुपाने हुडको या संस्थेकडून उपलब्ध करुन घेतल्यास प्रचलित १०.७५ % द.सा.द. शे. या दराने व्याज भरावे लागेल. सदर कर्जाचा परतावा कालावधी १५ वर्षांचा गृहीत धरला आहे. सदर कर्ज उपलब्ध करुन घेतल्यास भांडवली कामे पूर्ण होऊन विनामहसुल पाण्याचे प्रमाण २०% पर्यत कमी होणे, ग्राहकांच्या तक्रारीचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी होणे, वसुलीची टक्केवारी ९०% पर्यत, विद्युत खर्चात बचत होणे, इत्यादी फायदे अपेक्षित आहेत. त्यानुसार व्याजासहीत कर्जाचा परतावा गृहीत धरला तरी, मजीप्राला अंबरनाथ व बदलापूर दोन्ही शहरामधून एकत्रितरित्या दरवर्षी सुमारे रु. १७.७० कोटी एवढा फायदा अपेक्षित राहील.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

उपरोक्त पार्श्वभूमीवर अंबरनाथ बदलापूर शहरासाठी हुडकोकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन घेणे योग्य राहील. तद्नंतर याच धर्तीवर अमरावती, यवतमाळ, न्हावा-शेवा व लातूर या पाणी पुरवठा केंद्राच्या भांडवली खर्चाच्या कामाकरीता आवश्यकतेनुसार मजीप्राने कर्ज व लोकवर्गणीपोटीची रक्कम उभी करणे आवश्यक असलेल्या रक्कमेची पूर्तता करणेसाठी हुडको कडून कर्ज सहाय्य उपलब्ध करुन घेता येईल.

येथे विशेषत्वाने नमूद करण्यांत येते की, हुडको या वित्तीय संस्थेकडून यापूर्वी पाणी पुरवठा योजनांसाठी उपलब्ध झालेले कर्ज हे शासन हमीच्या अधीन राहून उपलब्ध झाले होते. तद्नंतर मात्र शासनाने शासन हमी देणे बंद केले होते. तथापि, हुडको या वित्त संस्थेच्या मुख्य प्रबंधकाशी दि. १४.०२.२०१३ रोजी केलेल्या चर्चेमध्ये सदर मुद्दा मजीप्रामार्फत उपस्थित करण्यांत आला असता, सदर शासन हमीची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यांत आले मात्र त्याऐवजी मजीप्राची मालमत्ता असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या मालमत्ता तारण म्हणून ठेवण्यांस मुख्य प्रबंधकानी सहमती दर्शविली आहे.

सबब, या सर्व बाबींचा विचार करुन, प्रस्ताव मा. संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव**

असा ठराव करण्यांत येतो की,

वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे अंबरनाथ व बदलापूर या दोन्ही शहरांच्या पाणी पुरवठा व्यवस्थेच्या कामांकरीता रु. ५४.८५ कोटी एवढी कर्ज व लोकवर्गणीपोटीची रक्कम तसेच या प्रकारच्या म.जी.प्रा.च्या इतर पाणी पुरवठा केंद्राच्या सुधारणा कामासाठी लागणाऱ्या कर्ज व लोकवर्गणीपोटी लागणारी रक्कम हुडको या वित्तीय संस्थेकडून कर्ज रुपाने उपलब्ध करुन घेण्याबाबत सविस्तर माहिती घेण्यास त्याबाबत अटी, शर्ती व आर्थिक सुसाध्यता तपासून मा.संचालक मंडळाच्या पुढील बैठकीसमोर प्रस्ताव आणण्यास मा.संचालक मंडळ मान्यता देत आहे. या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यांस सदस्य सचिव, मजीप्रा, यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

परिशिष्ट-एक

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईट,मुंबई

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी तरतूद करण्याकरिता नियम-२०१३,दिनांक : /२/२०१३

क्रमांक मजीप्रा-२०१३/ईटी-३१०/आ-१ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम ६६ (१) आणि ६६(२) मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण त्यांच्या नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन करण्यात येत आहे.

**प्रकरण १**

१. या नियमास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी तरतूद करण्याकरिता नियम-२०१३ असे संबोधण्यात येईल.

अ) हे नियम शासन मान्यतेनंतर, राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापासून अंमलात येतील

ब) हे नियम सदस्य सचिव ,संचालक वित्त, मुख्य प्रशासकीय अधिकारी व उप मुख्य लेखाधिकारी या संवर्गात शासनाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी वगळता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सर्व कर्मचाऱ्यांना लागू राहतील.

२. व्याख्या -

या नियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, --

क) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अधिनियम १९७६ च्या कलम ३ नुसार स्थापन झालेले महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

ख) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

ग) "सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा नियुक्ती प्राधिकारी असा आहे. आणि त्यात नियम ६ मध्ये विनिर्धिष्ठ केलेल्या बदली करणाऱ्या प्राधिकाऱ्याचा समावेश होतो.

घ) "गट अ, ब , क आणि ड पदे" याचा अर्थ, शासनाच्या आदेशानुसार, वेळोवेळी गट अ, ब, क आणि ड म्हणून वर्गीकृत केलेली , महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नियंत्रणा खालील पदे असा आहे.

ड) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचारी याचा अर्थ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८ नुसार नियुक्ती केलेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी.

च) "बदली" याचा अर्थ, महा.जीवन प्राधिकरणामधील कर्मचाऱ्यांची एका पदावरुन किंवा एका कार्यालयातून किंवा एका विभागातून दुसऱ्या पदावर , दुसऱ्या कार्यालयात किंवा विभागात होणारी पदस्थापना असा आहे.

छ) "बदली करणारे प्राधिकारी" याचा अर्थ , या नियमाच्या नियम ६ मध्ये नमुद केलेले प्राधिकारी असा आहे.

ज) परिमंडळ याचा अर्थ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर या मुख्यालयी अधीक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली स्थापीत झालेले परिमंडळ.तसेच आवश्यकतेनुसार मजीप्रातर्फे भविष्यात निर्माण होणारी परिमंडळे.

## प्रकरण २

### पदस्थापनेचा पदावधी , बदली व बदली करणारे प्राधिकारी

३(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतील अ,ब,क आणि ड गटातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सर्व कर्मचारी यांच्याकरिता एखादया पदावर असण्याचा सामान्य कालावधी ३ वर्षाचा असेल.

(२) गट ड मधील कर्मचाऱ्यासाठी सामान्य पदावधी निश्चित केला जाणार नाही. ते ज्या ठिकाणी काम करीत असतील त्या ठिकाणच्या बाहेर ज्या ठिकाणी त्यांनी बदली करण्याची विनंती केली असेल तेथे निर्धारित पद असल्याखेरीज किंवा परस्पर संमतीने बदली मागितली असल्याखेरीज किंवा त्यांच्या विरुध्द गंभीर स्वरुपाची साधार तक्रार आली असल्याखेरीज त्यांची त्या ठिकाणाहून अन्यत्र बदली केली जाणार नाही.

४ (१) सामान्य पणे कोणत्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचाऱ्यांनी नियम ३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचा नेमणूकीचा पदावधी पूर्ण केला असल्याखेरीज त्यांची बदली करण्यात येणार नाही.

(२) सक्षम प्राधिकारी प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात त्या वर्षी एप्रिल व मे महिन्यात बदलीसाठी पात्र होतील अशा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचाऱ्यांची यादी तयार करेल.

(३) नियम ६ खालील तक्त्यातील नोंदी (i) मध्ये विनिर्धीष्ठ केलेल्या गट अ अधिकाऱ्यांकरिता वरील पोट नियम २ अन्वये संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांनी तयार केलेल्या बदलीच्या यादीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचेकडून अंतिम मान्यता देण्यात येईल.

(४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या सामान्यपणे वर्षातून केवळ एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात येतील.

परंतु खाली नमुद केलेल्या परिस्थितीत वर्षातील कोणत्याही वेळी -

(एक) नव्याने निर्माण केलेल्या पदावर किंवा सेवानिवृत्ती,पदोन्नती ,राजीनामा, पदावनती, पुर्नस्थापना यामुळे किंवा बदलीच्या परिणामस्वरुप रिक्त झालेल्या पदावर किंवा रजेवरुन परत आल्याच्या बांबतीत.

(दोन) अपवादात्मक परिस्थिती मुळे किंवा विशेष कारणामुळे बदली करणे आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल,अशा बाबतीत तसे लेखी नमुद केल्यानंतर अशी बदली करण्यात येईल.

५ (१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचारी यांच्या नेमणुकीमध्ये नियम ३ मध्ये निर्धारित केलेला पदावधी खालील विनिर्दिष्ट केलेल्या अपवादात्मक प्रकरणामध्ये वाढविता येईल-

(क) नेमणुकीच्या ठिकाणी किंवा पदावर पदावधी पूर्ण केल्यानंतर, बदलीसाठी पात्र झालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीसाठी एक वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक असेल तेंव्हा.

(ख) कर्मचारी एखादया विशिष्ठ कामासाठी आवश्यक ती तांत्रिक अर्हता किंवा अनुभव धारण करणार असेल तर त्या पदासाठी योग्य असा बदली कर्मचारी तात्काळ उपलब्ध नसेल तेंव्हा आणि

(ग) एखादा कर्मचारी एखादया प्रकल्पावर/योजनेवर काम करीत असेल व तो प्रकल्प/योजना पूर्णतेच्या शेवटच्या टप्प्यात असेल आणि त्याला तेथून काढून घेण्याने प्रकल्प /योजना वेळेत पूर्ण होणेच धोक्यात येणार असेल तेंव्हा किंवा एखादया कर्मचाऱ्याला प्रकल्पावर /योजनेवर नेमणे हे तो प्रकल्प/ योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल तेंव्हा.

६ खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्याची बदली त्या कर्मचाऱ्याच्या समोरच्या स्तंभ दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बदली करणा-या प्राधिकाऱ्याला करता येईल.

| अ.क्र | मजीप्रा कर्मचाऱ्यांचे गट (१) | बदली करणारे सक्षम प्राधिकारी (२) |
|---|---|---|
| (i) | गट- अ संवर्गातील सर्व अधिकारी (सहा.कार्यकारी अभियंता, सहा.अभि.श्रेणी -१ गट अ , उप अभियंता व उप विभागीय अधिकारी वगळून | मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| (ii) | मुख्य अभियंता ते कार्यकारी अभियंता वगळता गट अ,ब,क व ड मधील सर्व अधिकारी/कर्मचारी | सदस्य सचिव |
| (iii) | मध्यवर्ती कार्यालयात नेमावयाचे गट क व ड मधील संवर्ग | मुख्य प्रशासकीय अधिकारी |
| (iv) | मुख्य अभियंत्यांच्या कार्यक्षेत्रातील शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता<br>तथापि त्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेरील अन्य कार्यक्षेत्रात बदली करावयाची झाल्यास | मुख्य अभियंता<br>सदस्य सचिव |
| (v) | परिमंडळातील गट क व ड संवर्ग | अधीक्षक अभियंता तथा संबंधीत परिमंडळ समितीचे अध्यक्ष |
| (vi) | परिमंडळांतर्गत गट क व ड संवर्गातील बदल्या करिता | त्या त्या परिमंडळीय अध्यक्षांच्या मान्यतेने. |